**प्रेसनोट दि. ०८.०४.२०२२**

श्री. प्रमोद काशीनाथ शिंदे, वय ५३ वर्ष, व्यवसाय – खाजगी एजंट, रा. सि.स.नं. १५४९, हिरा कृपा, वसंतनगर, सांगली, ता. मिरज जि. सांगली यांना ३,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे नगरभुमापन अधिकारी कार्यालय सांगली या कार्यालयात वारसांची नावे नोंद करणेचे काम होते. सदरचे काम होण्यासाठी नगरभुमापन अधिकारी कार्यालयातील संबंधीत अधिकारी यांना पैसे द्यावे लागतात असे सांगून श्री. प्रमोद शिंदे, खाजगी एजंट यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/- रूपये लाच म्हणून मागीतली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.३१.०३.२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ३१.०३.२०२२ व दिनांक ०७.०४.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये श्री. प्रमोद शिंदे यांनी तक्रारदार यांचे वारस नोंदीचे काम करण्याकरीता ५,०००/- रूपये लाचेची मागणी करून चर्चेअंती ३,०००/- रूपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि.०८.०४.२०२२ रोजी गणेश नाष्टा सेंटर, विश्रामबाग चौक, विश्रामबाग या ठिकाणी सापळा लावला असता श्री. प्रमोद काशीनाथ शिंदे, वय ५३ वर्ष, व्यवसाय – खाजगी एजंट, रा. सि.स.न. १५४९, हिरा कृपा, वसंतनगर, सांगली, ता. मिरज जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ३,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने श्री. प्रमोद काशीनाथ शिंदे, वय ५३ वर्ष, व्यवसाय – खाजगी एजंट, रा. सि.स.नं. १५४९, हिरा कृपा, वसंतनगर, सांगली, ता. मिरज जि. सांगली यांचे विरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, प्रितम चौगुले, सलिम मकानदार, सिमा माने, संजय संकपाळ, रविंद्र धुमाळ, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with CamScanner